International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# ब-बळीचा समकालीन कृषिसंस्कृतीची शोकान्त कथा

**प्रा. कल्याणी हौसेराव नायकवडी**
*सहाय्यक प्राध्यापक ( मराठी विभाग )*
*आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज , कासेगाव.*
*Corresponding Author - प्रा. कल्याणी हौसेराव नायकवडी*
**DOI - 10.5281/zenodo.10939396**

**प्रास्ताविक :**

समकालीन हा कालवाचक शब्द आहे. 'सम' म्हणजे समांतर सोबत. जे साहित्य आपल्या काळाबरोबर, काळासोबत, असते, त्या काळाच्या समांतर असते. ज्या काळात ते निर्माण होत असते. त्या काळातील समाजाचे प्रतिबिंब त्यात पडलेले असते. त्या काळात ज्या घटना घडत असतात, ज्या विचारप्रणाल्या प्रभावी असतात, त्या काळातील समाजातील लोकांची मानसिकता, जाणिवा मते तयार झालेली असतात, त्यांचे चित्रण ज्या साहित्यात घडते, त्याला 'समकालीन साहित्य' असे म्हणता येईल. 1960 नंतरचे साहित्य खऱ्या अर्थाने समकालीन साहित्य मानले जाते साठोत्तरी कालखंडात जे दलित, स्त्रीवादी, ग्रामीण साहित्यप्रवाह निर्माण झाले, ते आपल्या काळाशी आणि त्या काळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीशी जवळचे नाते सांगतात. दलित साहित्य प्रवाहामध्ये आपल्याला त्या कालखंडातील दलितांवर होणारे अन्याय, त्यांना पशुपातळीवरची मिळणारी वागणूक, गावगाड्यात जातीव्यवस्थेमुळे त्यांचे असलेले खालच्या पातळीवरील स्थान, शिक्षणामुळे - बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि कार्य यामुळे त्यांच्यात निर्माण होत गेलेले आत्मभान, विद्रोह यांचे चित्रण आलेले आहे.

ग्रामीण साहित्यप्रवाह अंतर्गत ज्या कथा, कविता, कादंबऱ्या लिहिल्या गेलेल्या आहेत. त्यामध्ये आपल्याला साठोत्तरी कालखंडातील ग्रामीण भागातील शेतकरी, बारा बलुतेदार यांचे दारिद्र्य, त्यांच्यातील सामाजिक आर्थिक पातळीवरील परस्परावलंबित्व, कृषी व्यवस्थेत कालानुसार होत गेलेले बदल, राजकारण - सहकार - शिक्षण यामुळे ग्रामीण भागात सामाजिक, राजकीय आणि आर्थिक पातळीवर झालेली परिवर्तने इत्यादीचे वास्तव चित्रण आलेले आहे. तर स्त्रीवादी साहित्यात पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीच्या वाट्याला आलेले दुय्यम स्थान, कौटुंबिक आणि सामाजिक पातळीवर तिच्यावर होणारे अन्याय 'चूल आणि मूल' एवढ्यापुरतेच मर्यादित असलेले त्यांचे विश्व, शिक्षित - उच्चशिक्षित - नोकरी करणाऱ्या स्त्रियांना आलेले त्यांच्या स्वत्वाचे भान, स्त्रियांचे उभ्या राहिलेल्या चळवळी इत्यादीचे

चित्रण आपल्याला स्त्रीवादी साहित्यात बघायला मिळते.

1960 नंतरचा कालखंड हा कादंबरीचा आहे या कालखंडात विविध प्रवाहांमधून कादंबरी लेखन झाले. ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी या प्रवाहांमधून मुख्यत्वे कादंबरी लेखन झालेले दिसते. प्रस्तुत शोधनिबंधातून याच प्रवाहांच्या माध्यमातून 'ब-बळीचा' ह्या कादंबरीचा आढावा घेतलेला आहे....

80 च्या दशकातले एक महत्त्वाचे ग्रामीण लेखक म्हणजे डॉ. राजन गवस होत. मराठी विषयाचे व्यासंगी प्राध्यापक म्हणून त्यांनी अनेक ठिकाणी काम केले. कथा, कादंबरी, कविता, ललितगद्य हे चारही साहित्यप्रकार डॉ.गवस यांनी हाताळून ग्रामीण जीवनाचं वास्तव चित्रण रेखाटण्याचे काम केले आहे डॉ. गवस यांच्या कसदार लेखनाने खरे ग्रामीणतत्व काय आहे ? शेतकऱ्याच्या जीवनात जागतिकीकरणामुळे काय फरक पडला ? हे सगळे प्रश्न निर्माण करून या कृषी संस्कृतीला खरा बळी कोण हे दाखवण्याचा प्रभावी प्रयत्न त्यांनी 'ब-बळीचा ' या ग्रामीण कादंबरीत केला आहे.

2015 मध्ये पॉप्युलर प्रकाशनाने ही कादंबरी प्रकाशित केली असून या कादंबरीच्या मुखपृष्ठाने या कादंबरीतील कथानकाला एक वेगळे परिमाण मिळाले आहे. शेतकऱ्याच्या जीवनातील एक हृदयद्रावक कथा या कादंबरीत आली आहे. नागरीकरणाने खेड्यांना काय दिले असेल तर फा फायदे कमी आणि तोटेच जास्त दिले आहेत. भारताचे खरे अर्थकारण हे कृषीसंस्कृतीतून चालते पण या शेतकऱ्यांना बि-बियाने, सेंद्रिय खते, शेतीची आधुनिक औजारे यांचे वाढलेल्या उत्पादन खर्चाने पांगळे करून टाकले आहे.

जागतिकीकरणाचा एक परिणाम म्हणजे शेतीमध्ये आलेले यांत्रिकीकरण हे यांत्रिकीकरणामुळे शेतीचा फायदा होण्याऐवजी तोटाच कसा झाला याचे प्रत्यंतर 'ब- बळीचा' कादंबरी वाचत असताना याचा प्रत्यय वाचकाला येत असतो. कथांतर्गत कथा आणि कथानक अशी एकमेकांशी गुंफवत डॉ. गवस यांनी वास्तवाचे भान व संवेदनशीलता काय असते याची खरी जाणीव वाचकांना करून दिली आहे. डायऱ्या, पटकथा, म. फुले यांना लिहिलेली पत्रे अशा वेगवेगळ्या माध्यमांचा वापर करत डॉ. राजन गवस यांनी एक प्रायोगिक स्वरूपाची कादंबरी साकार केलेली आहे. त्यामुळे ही कादंबरी एक वेगळे परीणाम साधते. म. फुले यांनी लिहिलेली पत्रे यावरून म. फुले यांचा काळ आणि आजचा काळ यांच्यातील झालेली मूल्ये आणि संस्कृतीची तफावत जाणवते. दिपूशेठ, कोणकेरी आणि आडव्याप्या ही तीन मुख्य पात्रे या कादंबरीत आहेत या तीनही पात्रांचा शेतकरी जीवनाशी अतिशय जवळचा संबंध आहे. कोणकेरी हा एक कोरडवाहू शेतकऱ्याचा मुलगा आहे. काळाच्या ओघात शेतीची झालेली दूरवस्था त्याला शेतीपासून फार दूर घेऊन जाते. देशात सगळयात जास्त भ्रष्टाचार होणाऱ्या महसूल विभागात कोणेकरी नोकरी करत होते. एका शेतकऱ्याचा मुलगा आणि तो भ्रष्टाचारी क्षेत्रामध्ये राहून त्याला अस्वस्थ वाटायला लागते त्याला मानसिक समाधान मिळत नाही संवेदनशील असणारा कोणकेरी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांप्रमाणे भ्रष्टाचार न करता त्यांना कधी कधी विरोध करतो

आणि त्या विरोधाला विरोध म्हणून कोणकेरी कोंडीत पकडला जातो आणि त्याची किंमत त्याला चुकवावी लागते.

उप्पेटबेटगिरी या गावी कोणकेरी नोकरी करतो. हे तालुक्याचे ठिकाण असून येथे तहसिल कार्यालय आहे. कादंबरीतील दुसरे पात्र म्हणजे उप्पेटबेटगिरी या गावात भांडेविक्री करणारा दिपूशेठ हे होय.दिपूशेठचा आपल्या भांडेविक्रीच्या व्यवसायामुळे पंचक्रोशीतील शेतकऱ्यांशी त्याचा रोजचाच संबंध येतो. कादंबरीतील तिसरे पात्र म्हणजे या सृष्टीचा अविभाज्य घटक म्हणजेच शेतकरी असणारा आडव्याप्पा हा होय. अशा शेतीशी संबंध येणाऱ्या पत्रांमुळे शेतीचे अर्थकारण नेमके काय आहे; याची जाणीव आपणास होते. शेतकऱ्याच्या वेदनेचे खरे मूळ शोधण्याचा प्रयत्न या कादंबरीतून डॉ. गवस यांनी केला आहे.

कादंबरीतील समकालीन वास्तवाचा विचार केला तर शिक्षणाचा प्रसार झाल्याने शेतकऱ्याची मुले शिकू लागली पण शिक्षण हे साध्य नसून साधन आहे याची जाणीव शेतकऱ्यांच्या मुलांना झाली नाही फक्त नोकरी मिळवणे या उद्देशाने ते शिकू लागले. नोकऱ्यांसाठीच शिक्षण पूर्ण करावं याचं पक्क समीकरण डोक्यात बसलेल्या युवकांनी श्रमसंस्कृतीला तिलांजली दिली. एका अर्थाने शिक्षणाने त्यांचे श्रम काढून घेतले आणि त्यांना पांगळे, लाचार, बेकार बनवले कारण ब्रिटिश भारतातून गेल्यावर आपण शिक्षण पद्धतीत कुठलाच बदल घडवला नाही हा वास्तव आक्षेप डॉ. राजन गवस यांचा आहे. स्वतः त्यांनी शिक्षणव्यवस्थेत इतकी वर्षे काम केले असल्याने त्यांना शिक्षणव्यवस्थेतील सगळी वळणे, वाटा, राजकारण, वास्तव आणि दांभिकता याची परिपूर्ण जाणीव आहे. शिक्षण क्षेत्रात सरांनी अनेक वर्षे काम केल्यामुळे शिक्षणाचा प्रचार - प्रसार आणि शेतकऱ्यांच्या मुलांची शिक्षण घेत असताना काय अवस्था होते हे सरांनी जवळून पाहिलं होत आणि त्या समकालीन शिक्षणव्यवस्थेवर कडाडून हल्ला सरांनी चढवला आहे हे या कादंबरीतून दिसते.

नोकरी म्हणजे पैसा, वातानुकूलीत खोलीत बसून हाताशी नोकर चाकर याची अवास्तव अपेक्षा बाळगत शिक्षण केल्यावर एक ना धड भाराभर चिंध्या या म्हणीप्रमाणे शेतकऱ्यांच्या मुलांची अवस्था झाली त्यांना गोठ्यात शेण भरायचे तर इस्त्रीची कपडे खराब होतील. समाज आपणास शिकूनही नोकरी नाही म्हणून अवहेलना करील याची लाज आज ग्रामीण भागात दिसते. समाज काय म्हणेल हा माणसाच्या जीवनातला फार मोठा अडथळा झाला आहे. या युगात हा अडथळा पार करणे अतिशय महत्त्वाचे आहे या त्याशिवाय आपली प्रगती होणार नाही याचीही जाणीव ह्या कादंबरीत होते.

समाजाची किडलेली मने, असंवेदनशील वृत्ती, संकुचित आणि आत्मकेंद्रीपणा आपणास वाचनातून जाणवतो. अशा वृत्तीमुळे शहरीकरणाच्या वाढत्या समस्यांमुळे कुटुंबपद्धतीला छेद गेला आणि वेगवेगळी पवित्र असणारी नाती दुभंगली गेली. माणूस माणसापासून दूर गेला त्यांचा एकमेकांचा संवाद कमी आला मनाचा ताण, दडपण काळाच्या ओघात त्रासदायक ठरू लागले.

कांताराम वडवट्टीकर, गोऱ्या कातडीची बाई, झिंगारू दारूवाला, पैलवानछाप बुलगाणीवाला, निवृत्त ग्रामसेवक आणि धनगरवाड्यावरचा म्हातारा ही पात्रे देखील या कादंबरी मध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. या पात्रांमुळेच कादंबरीत एक मोठी गुंतागुंत होताना आपल्याला दिसते. दिपूशेठ, कोणकेरी, आडव्याप्या हे तिघेही हा सगळा गुंता सोडविण्याचा प्रयत्न करत असतात आणि त्यातच अधिक ते गुरफटूनही जातात. कादंबरीतील गुंतागुंत वाचकांच्या पण मनात गुंता निर्माण करते. वाचकही कादंबरीत इतका गुरफटतो की कादंबरी संपल्यावरच तो ह्या साऱ्या गुंत्यातून बाहेर येतो. आपण जीवन जगत असताना जो शुष्क कोरडेपणा आजच्या ह्या स्थितीत जाणवतो तो जसाच्या तसा ह्या कादंबरीत जाणवतो. मित्र - परिवार, नाती - गोती, सगे - सोयरे, स्नेह - संबंध यापैकी कोणीही आजच्या जगात कोणाचं नाही. पैसा हीच गोष्ट खूप महत्त्वाची आहे सगळयांनी पैशाच्या मागे धावायचं आणि पैसा हेच एक तत्त्व या नागरीकरणाच्या युगात जपायचं. या पैशामुळे मानवी नात्यात निर्माण झालेले हे कोरडेपण माणसाला उध्वस्त करते आहे. प्रामाणिकपणाला काही किंमत नाही कारण सारे राज्य हे चोरांचे आहे.

कोणकेरी ज्या ऑफिसात काम करतो तिथे सगळा पैशाचा बाजार आहे जो आज सर्व तहसील कार्यालयांमध्ये चालू आहे. या गोष्टीची जाणीव महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याला आणि शेतकऱ्याच्या मुलाला आहे. महसूल खाते म्हणजे दुभती गाय होय. पैशासाठी माणूस कोणाचाही बळी घेऊ शकतो याची जाणीव कोणकेरी करून देतो. प्रामाणिकपणे जीवन जगणाऱ्या माणसाला जीवन जगता येत नाही त्याचे हे भ्रष्टाचारी लोक जीणं हराम करून टाकतात. भ्रष्टाचारी दुनियेत स्वतःलाही भ्रष्टाचारी व्हावे लागते नाहीतर याची मोठी किंमत चुकवावी लागते. कोणकेरीच्या कार्यालयात त्याला असेच वाईट अनुभव येतात त्याचे जीवन असहाय्य होऊन जाते. कोणकेरीच्या नोकरीच्या ठिकाणी आलेल्या ह्या सर्व अनुभवांची माहिती तो गायब झाल्यावर दिपूशेठला कळते. दिपूशेठला कोणकेरीच्या मैत्रीमुळे बऱ्याच वाईट अनुभवांना सामोरे जावे लागते. कुठून या लफड्यात पडलो असे उद्गार दिपूशेठच्या बोलण्यातून बहुतांश वेळा जाणवतात.

ग्रामीण भागातील सगळे सुशिक्षित शिकलेले युवक शहरांकडे आकर्षित झालेली असल्यामुळे आज खेडी ओस पडली आहेत याचे भयानक चित्रण 'ब - बळीचा' या कादंबरीमध्ये मांडले आहे. गांधीजींनी खेड्याकडे चला सांगितले. पूर्वी खेडी ही स्वयंपूर्ण होती पण आज खेड्यांची अवस्था दयनीय झालेली आहे. महाराष्ट्रात 80 टक्के शेतकरी हे सर्वसामान्य आहेत त्यांना या भ्रष्टाचाराच्या युगात कागदपत्रे, खरेदीखते, नोदी वा तत्सम कामासाठी पैसे द्यावे लागतात. कोणकेरीचे मन संवेदनशील असल्याने त्याच्या मनाला या सर्व घटना बघून वेदना होतात. या सर्व गोष्टींना भ्रष्ट राजकारणच जबाबदार आहे याची जाणीव वाचकाच्या मनात आल्याशिवाय राहत नाही. आडव्याप्याला सूडबुद्धीने सोसायटीमध्ये मिळणारी वागणूक भीषण आहे आणि खेड्यातले राजकारण कसे बेरके झाले आहे ते आपणास दिसते.

सावकारांची कर्ज शेतकऱ्याला आपल्या आयुष्यातून उठवतात. चक्रव्याढ व्याज जमिनीचा

कब्जा म्हणजेच एक प्रकारे शेतकऱ्याच्या नरडीचा घोटच घेतला जातो. हे वास्तव सत्य डॉ. राजन गवस यांनी मांडले आहे. एकूणच 'ब - बळीचा' या कादंबरीत ग्रामीण संवेदनांचा ठेवा आहे. ग्रामीण जीवनातील सुख-दुःखे, चढ-उतार, स्थिती गती याबाबतची लेखकाची संवेदना प्रकट झाले आहे शेतीतील औजारे, बैल, नांगर, बियाने, शेती, ग्रामीणता, ग्रामीण बोली, दुष्काळ, कर्ज, राजकारण असे अनेक संदर्भ या कादंबरीत येतात.

'ब-बळीचा' या कादंबरीचा समकालीन दृष्टिकोनातून विचार करत असताना तत्कालीन समकालीन सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक स्थित्यंतरे याचा परिणाम या कादंबरीतील प्रत्येक पात्रांवर, त्यांच्या जीवनावर तसेच जीवनातील विविध घटना प्रसंगांच्यावर झालेला या कादंबरीमध्ये दिसून येतो तसेच आजच्या परिस्थितीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांची स्थिती आजच्या नोकरदाराची स्थिती यामध्ये आलेली आहे नोकरी करणारा माणूस आणि शेती व्यवसाय करणारा माणूस यांना शासन कसं नडतं किंवा शासन कशा पद्धतीने फसवणूक करतो नोकरीमध्ये देखील कशा पद्धतीने भ्रष्टाचार होतो हे सध्यकालीन परिस्थितीवर भाष्य करणारी कादंबरी आहे. आजच्या खेड्यातील उध्वस्त चित्रण या कादंबरीत आलेले आहे. शहरी जीवनापासून माणूस लांब पळण्याचा प्रयत्न करतो पण कुठे जायचं हेच समजत नाही त्याच्या मध्ये सुभक्ता आहे पण काय शोधायचं हेच समजत नाही. जागतिकीकरण आले, शिक्षणाचा झपाटाने प्रसार झाला, भांडवलदारीला उत आला, त्याप्रमाणे चंगळवादाकडे सगळी तरुणाई झुकत चालली, इंटरनेटचा प्रसार झाला त्याचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. हे होत असताना आजही आपल्याला कल्लाप्पा कोणेकर जागोजागी दिसून येतो. भ्रष्ट व्यवस्थेला बळी पडलेला कलाप्पा कोणेकरी हा समाजामध्ये अनेक व्यक्तिमत्त्वांमध्ये दिसून येतो. समाजामध्ये आज अनेक कलाप्पा कोणेकरी सत्व हरवून बसलेले आहेत आणि कुटुंबासाठी लढणारा झटणारा आडव्याप्या पाहायला मिळतो. म्हणून ही समकालीनता आपल्या जीवनावर प्रखर भाष्य करणारी कादंबरी महत्वपूर्ण ठरते.

**संदर्भ:**


1. कुलकर्णी, द.भि,' कादंबरी: स्वरूप व समीक्षा', पद्मगंधा प्रकाशन,
2. आसोलकर, शरयू,'ब-बळीचा विषय', दर्या प्रकाशन.
3. कुलकर्णी, द.भि, 'समकालीन साहित्य प्रवृत्ती व प्रेरणा', अभिनंदन ग्रंथ.
4. कटारे, मोतीराम, 'समकालीन साहित्य वेध', प्रतिभा, 2020.